कलम-१९

# अधिसूचना

## जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय, जिल्हा यवतमाळ

**क्रमांक -प्र.अ./भुस./कली./कावि/६९६/ २०१७** **दिनांक :-११/०४/२०१७** ९

**(भूमीसंपादन, पनुर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)**

**प्रकरण भू.सं.प्र. ३६/४७/२०१५-१६** **मौजा- तपोना ता.दारव्हा जि.यवतमाळ**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम , २०१३ (२०१३ चा ३०) यापुढे ज्यांचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्रमांक /भू.सं/कावी/७१/२०१७ दिनांक २८/१/२०१७ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीनीची,अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल ,कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून, उक्त अधिनिमाच्या कलम **१९ च्या पोट कलम (१) च्या** तरतुदीमध्ये,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनूसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून,पुनर्वसन योजनेचा सारांश अनूसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनिमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिका-याची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी दारव्हा जि.यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची - एक
### संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन

**गाव- तपोना** तालुका - **दारव्हा** जिल्हा - **यवतमाळ**

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादना खालील क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | १६० | ०.०७ |
| २ | १६१ | ०.१७ |
| ३ | १६२ | ०.२३ |
| ४ | १६४ | ०.२४ |
| ५ | १६६ | ०.३१ |
| ६ | १६८ | ०.४२ |
| ७ | ३८ | ०.४६ |
| ८ | ३९ | १.१२ |
| ९ | ३७ | ०.९५ |
| १० | ३६ | ०.८९ |
| ११ | ४० | १.६२ |
| १२ | ३५ | ०.३१ |
| १३ | ३४ | ०.२६ |
| १४ | ४१ | ०.६५ |
| १५ | ४२ | ०.५९ |
| १६ | ४३ | ०.८२ |
| १७ | ४४/१ | ०.११ |
| १८ | ५३/२ | १.१४ |